www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

दैं.युवक आधार करीता प्रतिनधिी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड ,आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 225 वा मंगळवार दि. 29 एप्रिल २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## "ठाणे जिल्हा पॉवरलिफ्टिंग स्पर्धेचे विजेते,"सुष्मिता देशमुख व राजेश लांजेकर"

### गोवेली येथे जिल्हास्तरीयपॉवरलिफ्टिंग स्पर्धा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**



*दि.२७ एप्रिल , गोवेली: ठाणे जिल्हा पॉवरलिफ्टिंग असोसिएशन आयोजित जिल्हास्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धा जीवनदीप महाविद्यालय गोवेली यांच्या सहकार्याने* *दिनांक २७ एप्रिल २०२५ रोजी जीवनदीप महाविद्यालयाच्या प्रांगणात संपन्न झाली. या स्पर्धेचे उद्घाटन जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष रविंद्र घोडविंदे सर, शिवछत्रपती पुरस्कार विजेते अनंत चाळके, निवृत्त नौदल अधिकारी दत्तात्रय उतेकर,नितीन कुडाळकर,अध्यक्ष ठाणे पॉवरलिफ्टिंग सरचिटणीस नवनाथ गायकर, माजी सरचिटणीस आणि आंतरराष्ट्रीय मास्टर्स खेळाडू देवदत्त भोईर माजी अध्यक्ष विनायक कारभारी,प्रशांत दुमडे , अमोल कडूसकर,सुरेश चेडे,पालघर जिल्हा सरचिटणीस रवींद्रनाथ गायकर,जीवनदीप महाविद्यालयाचे क्रीडा संचालक मोहनीश देशमुख व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. या स्पर्धेत पुरुष गटात राजेश लांजेकर याने व महिला गटात सुश्मिता देशमुख हिने स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट स्पर्धक होण्याचा बहुमान मिळविला.तर पुरुष गटात एनर्जीया जिम ठाणे यांनी ६० गुण मिळवून सांघिक विजेतेपद पटकावले. तर महिला गटात द युनायटेड स्पोर्ट्स क्लब ठाणे यांनी ४५ गुण मिळवून विजेतेतेपद पटकावले.या स्पर्धेत विजयी झालेल्या खेळाडूंची निवड पुढील महिन्यात होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी ठाणे जिल्ह्याच्या संघात झाली आहे

## क्रिकेट च्या भव्य स्पर्धा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

सणसर चे ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराज यांचे यात्रा उत्सवा निमित्त श्री छत्रपती हायस्कूल च्या क्रीडांगणावरती मर्यादित षटकांचे क्रिकेटचे भव्य व दिव्य स्पर्धेचे नवयुग प्रतिष्ठान सणसर यांच्या वतीने "श्री भैरवनाथ चषक 2025 "चे आयोजन दि २५/४/२५ ते २७/४/२५ दरम्यान करण्यात आले होते, यासाठी प्रथम बक्षीस ७००० रुपये द्वितीय बक्षीस ५००० रुपये तृतीय बक्षीस ३००० रुपये व चतुर्थ बक्षीस २००० रुपये देण्यात आले,यांबरोबरच सर्व विजेत्या संघास आकर्षक ट्रॉफी देण्यात आल्या,व अनेक उत्कृष्ट खेळाडुंना वैयक्तिक बक्षिसे व ट्राफी देऊन सन्मानित करण्यात आले,या स्पर्धेसाठी यात्रा कमिटी अध्यक्ष, खजिनदार,सरपंच व अनेक दानशूर व्यक्तींनी आपले बहुमूल्य बक्षीस रुपी योगदान दिले,इंदापूर बारामती तालुक्यातून जवळपास 20 संघांनी आपला सहभाग नोंदवला,यामध्ये प्रथम क्रमांक रायते मळा मित्र मंडळ सणसर,द्वितीय बक्षीस क्रमांक नवयुग प्रतिष्ठान सणसर, तृतीय बक्षीस भिगवन संघाने व चतुर्थ बक्षीस न्यू शक्ती तरुण मंडळ,सणसर यांनी पटकावले,या स्पर्धा यशस्वी होण्यासाठी जय बजरंग तरुण मंडळ सणसर,श्री छत्रपती हायस्कूल सणसर व सणसर गावातील अनेक तरुण सहकारी क्रिकेट प्रेमी व ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य केले,स्पर्धा पार पाडण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल, आयोजकांनी सर्वांचेच मनापासून आभार मानले.

## ' मे' महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच दहावी आणि बारावीचा निकाल..

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी. उमेश पाटील.**

पुणे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावी बारावी परीक्षेच्या 21 लाख विद्यार्थ्यांच्या निकालाची प्रतीक्षा संपली. मे महिन्यात या दोन्ही परीक्षांचा निकाल जाहीर होणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात बारावीचा तर दुसऱ्या आठवड्यात दहावीचा निकाल जाहीर होईल अशी माहिती महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे देण्यात आली या निकालाच्या तारखा लवकरच जाहीर केल्या जातील असे बोर्डाकडून सांगण्यात आले आहे. 15 मे पर्यंत निकाल लागू शकतो मात्र यामुळे विद्यार्थ्यांनी पालक दोघांचेही धडपड वाढली आहे. यावर्षी 11 फेब्रुवारी ते 18 मार्चपर्यंत बारावीची परीक्षा झाली होती. यावर्षी एकूण पंधरा लाख पाच हजार 34 हजार विद्यार्थ्यांनी बारावीची परीक्षा दिली, 3 हजार 373 परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा पार पडली तर इयत्ता दहावी ची परीक्षा 21 फेब्रुवारी रोजी सुरू झाली ती 17 मार्च पर्यंत होती. विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक प्रवेश प्रक्रियेसाठी पुरेसा वेळ मिळायला हवा या हेतूने बोर्डाने यंदाच्या वर्षी परीक्षा आधीच घेतली आणि निकाल ही लवकर जाहीर करण्याचा निर्णय घेतला आहे यामुळे आता मे महिना संपण्याच्या आतच दहावी आणि बारावी या दोन्ही वर्गांचा निकाल जाहीर होईल, यामुळे पुढील शैक्षणिक प्रवेश प्रक्रियेसाठी पुरेसा वेळ विद्यार्थी व पालकांना मिळेल.

# आगे आगे देखो होता है क्या' - माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे सूचक वक्तव्य

## पनवेलमध्ये शेकापला तर खालापूर तालुक्यात काँग्रेसला मोठा दणका शेकापचे नेते प्रभुदास भोईर

## हजारो समर्थकांसह भाजपात; काँग्रसनेते कृष्णाशेठ पारंगे अनेक समर्थकांसह भाजपमध्ये

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

आपल्या परिसराचा विकास व्हावा यासाठी विविध पक्षातील पदाधिकारी कार्यकर्ते भारतीय जनता पार्टीमध्ये सहभागी होत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीने लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत घवघवीत यशस्वी कामगिरी केली आहे. तसेच पनवेल







आम्ही पिढ्यानपिढ्या शेकापाक्षात होतो. भाजपमध्ये काम करणाऱ्याला संधी मिळते आणि भाजपात काम करण्याची पद्धत चांगली आहे, त्यामुळे जगातील सर्वात मोठ्या या पक्षात काम करण्याचा निर्णय घेतला.
-- अतुल मारुती घरत

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेब प्रत्येक कार्यकत्यांच्या मागे खंबीरपणे उभे राहतात. लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेबांमुळे प्रत्येक कार्यकत्यांची नेहमीच कॉलर टाईट असते. गेली २५ वर्ष माझ्यासारखा प्रत्येक कार्यकर्ता त्यांची राजकीय कारकीर्द जवळून अनुभवतोय. मी व माझ्या हजारो समर्थकांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे आणि वाचा सार्थ अभिमान वाटतोय, असे प्रतिपादन प्रभुदास भोईर यांनी केले. भारतीय जनता पक्षात प्रवेश केला त्यामुळे खऱ्या अर्थाने आमच्या सारख्या कार्यकत्यांसाठी आज आनंदाचा दिवस आहे. गेली २५ वर्षे आम्ही शेतकरी कामगार पक्षाचे काम करत होतो. कोणी लहान नाही किंवा मोठा नाही, या भावनेने आम्ही एकदिलाने संघटनेचे काम केले. मात्र, भाजप हा कार्यकत्यांना मानसन्मान देणारा पक्ष आहे. त्यामुळे आम्ही भाजपमध्ये मोठ्या संख्येने प्रवेश केला आहे. यापुढे पक्षाच्या विचारधारेने व अधिक जोमाने काम करू, असेही प्रभुदास भोईर यांनी आपल्या मनोगतातून स्पष्ट केले.



मतदार संघात देखील पक्षाला चांगले यश मिळाले असून येणाऱ्या काळात आपले आणखी आमदार वाढणार आहेत. आपला विभाग मजबूत करा. पनवेल महापालिका, ग्रामपंचायत, जिल्हा परिषदा, पंचायत समिती निवडणुकीच्या दृष्टीकोनातून कामाला लागा. भाजपमध्ये ज्या वेगाने पक्ष प्रवेश होतोय त्यामुळे येणाऱ्या काळात हा जिल्हा संपूर्ण भाजपमय होईल असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी करतानाच 'आगे आगे देखो होता है क्या' असे सूचक वक्तव्य केले. भारतीय जनता पार्टीत विविध पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा जाहीर पक्ष प्रवेश आणि उत्तर रायगड जिल्हयातील नवनियुक्त मंडल अध्यक्षांचा सत्कार समारंभ पनवेलमध्ये संपन्न झाला. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील, ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, दीपक बेहेरे, उपाध्यक्ष जयंत पगडे, सुधीर ठोंबरे, उरण तालुका माजी अध्यक्ष रवी भोईर, माजी नगरसेवक अनिल भगत, विजय चिपळेकर, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, जीवन गावंड, अमित जाधव, ज्ञानेश्वर घरत, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अभिषेक भोपी, यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. शेकापला लागलेली घरघर थांबण्याचा नाव घेत नाही. नुकताच अलिबागचे माजी आमदार पंडित पाटील, अड. आस्वाद पाटील आणि त्यांच्या हजारो समर्थकांनी प्रवेश करत अलिबागमध्ये शेकापला जोरदार धक्का दिला.आता शेकापच्या वाहतूक संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष प्रभुदास भोईर ऊर्फ प्रभूअण्णा यांनी त्यांच्या जवळपास पंधराशे कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये जाहीर प्रवेश करत पनवेलमध्ये शेतकरी कामगार पक्षाला मोठा दणका दिला. तसेच खालापूर तालुक्यातील काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष काँग्रेसनेते कृष्णाशेठ पारंगे यांनी त्यांच्या समर्थकांसह भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. प्रभुदास भोईर यांचे आशिष शेलार यांच्या हस्ते पक्षाची शाल देऊन पक्षात स्वागत करण्यात आले. तर लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते कृष्णाशेठ पारंगे यांना प्रवेश देण्यात आला. उत्तर रायगड जिल्हयातील नवनियुक्त खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, नेरे मंडल भूपेंद्र पाटील, कामोठे मंडल विकास घरत, पनवेल शहर मंडल सुमित झुंझारराव, कळंबोली मंडल अमर पाटील, नवीन पनवेल **पान २ वर**

## सिल्लोड येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने पहलगाम हल्ल्याचा निषेध




**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** भारतीय जनता पार्टीच्या वतीने शहरातील प्रियदर्शनी चौकात रविवारी दुपारी पहलगाम हल्ल्याचा निषेध करण्यात आला. यावेळी भाजप पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी पाकिस्तान विरोधी घोषणा देत परिसर दणाणून सोडला. पहलगाम हल्ल्याचा निषेध करीत भाजप पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी निष्पाप पर्यटकांचा बळी घेणाऱ्या दहशतवाद्यांना पकडून फासावर लटकावण्याची मागणी केली. यावेळी पाकिस्तानचा ध्वज जाळत पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा देण्यात आल्या. केंद्र शासनाने कडक पावले उचलून पाकिस्तानला कायमचा धडा शिकवावा. तसेच दहशतवाद्यांना मदत करणाऱ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी यावेळी आंदोलनकर्त्यांनी केली. भाजपचे शहर मंडळ अध्यक्ष मनोज मोरेल्लू यांच्या नेतृत्वाखाली हे निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष सुनील मिरकर, कमलेश कटारिया, जिल्हा उपाध्यक्ष विलास पाटील, विष्णू काटकर, विजय मंडलेचा, शामराव आळणे, राजू शिरसाठ, प्रकाश भोजवणी, आकाश कुमावत, स्वप्नील शिनगारे, मयूर कुलकर्णी, मोतीराम मिसाळ, गौरव अग्रवाल, नंदू श्रीवास्तव, योगेश साळवे, राजू गायकवाड, अतुल वाघ आदी उपस्थित होते.

## एक तपासणी, एक जीव वाचवू शकते — 30 एप्रिलला कोप्रोलीत मोफत कॅन्सर तपासणी




**शिबिर**
**दैनिक युवक आधार**
**उरणप्रतिनिधी/सायली साळुंके**

प्रत्येक वेळची तपासणी म्हणजे एक आयुष्य वाचवण्याची संधी" या संदेशासह, कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्रात 30एप्रिल 2025 रोजी मोफत कॅन्सर तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. सकाळी9:00 ते सायंकाळी 5:00 वाजेपर्यंत तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत ही सेवा उपलब्ध असेल. या शिबिरांतर्गत मुखाचा कॅन्सर, स्तनाचा कॅन्सर आणि गर्भाशय मुखाचा कॅन्सर (Cervical Cancer) यासंदर्भातील संशयित रुग्णांची सखोल तपासणी केली जाणार आहे. कॅन्सरची सुरुवातीच्या टप्प्यावर ओळख झाल्यास उपचार अधिक प्रभावी होतात. त्यामुळे वेळ न दवडता नागरिकांनी आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी व या शिबिराचा लाभ घ्यावा," असे आवाहन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र इटकरे, डॉ. बाबासाहेब कालेल आणि गटविकास अधिकारी श्री. समीर वाठारकर यांनी केले आहे.

## 200 कोटीचे करंजा मच्छीमार बंदर चिखलात ! अडकलय घोटाळ्याच्या भोवऱ्यात

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**



उरण तालुक्यातील करंजा येथे सुमारे 200 कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेलं मच्छीमार बंदर सुरू होण्याआधीच चिखलात रुतलं आहे. ठेकेदाराकडून वापरलेल्या निकृष्ट दर्जाच्या चिखल-भरावामुळे बोटी लावणे अवघड बनले असून, हा प्रकल्प आता अपयशाचं प्रतीक बनू लागला आहे. बंदर उभारणीत मातीऐवजी चिखल व दगडांचा वापर ठेकेदाराकडून करण्यात आला होता. दोन पावसाळ्यांत भराव वाहून गेला, तरीही प्रशासनाने कारवाई टाळली. यावरून ठेकेदार व अधिकाऱ्यांमधील आर्थिक साटेलोटे स्पष्ट होतात, असा आरोप मच्छीमार बांधवांकडून केला जात आहे. विशेष म्हणजे, मेरिटाईम बोर्डाने हे बंदर फिशरीज विभागाकडे हस्तांतरित केलेलेच नाही, ही बाब खुद्द फिशरीज अधिकाऱ्यांनी स्पष्ट केली आहे. त्यामुळे हे बंदर अधिकृत की अनधिकृत, याचा खुलासा अद्याप झालेला नाही. काम सुरू असताना अनेक वेळा तक्रारी करण्यात आल्या, पण ठेकेदारावर कोणतीही कारवाई झाली नाही. उलट, स्थानिक मच्छीमार सोसायट्यांचे पदाधिकारीही गप्प असल्याने त्यांच्यावरही संशय व्यक्त केला जातो आहे. गाळामुळे बोटी रुततायत त्यामुळे अपघाताचा धोका बळावला आहे. मात्र बंदर सुरू झाल्यानंतर काही महिन्यांतच गाळाची समस्या वाढू लागली आहे. भरती-ओहोटीच्या वेळी पाण्याची पातळी कमी असल्याने बोटी अडकतात, आपटतात. त्यामुळे जीवितहानी आणि नुकसान होण्याचा धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र फिशरमन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मार्तंड नाखवा यांनी तातडीने ड्रेजिंग करण्याची मागणी केली आहे, अन्यथा मोठा अपघात होण्याची शक्यता वर्तवली आहे. मच्छीमार बांधवांचा आरोप आहे की, काही राजकीय नेत्यांनी या बंदराचा वापर स्वार्थासाठी केला. आता तरी बंदर अधिकृत आहे की नाही, यावर सरकारने खुलासा करावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

## दादासाहेब फाळके चित्रपट युनियनच्या वैद्यकीय जागरूकता अधिकारीपदी डॉ. सचिन भामरे यांची नियुक्ती






**दैनिक युवक आधार**
**- किशोर रमाकांत गुडेकर,**
**मुंबई प्रतिनिधी विभाग प्रमुख**

मुंबई : कळवा येथील रहिवासी आणि घाटकोपर, विक्रोळी, डोंबिवली तसेच ठाणे या चार ठिकाणी वैद्यकीय सेवा देणारे प्रख्यात कन्सल्टिंग होमिओपथ डॉ. सचिन भामरे यांची नुकतीच घाटकोपर मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्षपदी निवड झाली. तब्बल 900 रजिस्टर्ड डॉक्टर असलेल्या या प्रतिष्ठित संघटनेचे नेतृत्व करण्याचा सन्मान त्यांना मिळाला आहे.

डॉ. भामरे यांचे शिक्षण औरंगाबाद व कळवा येथील राजीव गांधी गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेजमध्ये झाले असून, त्यांनी क्लासिकल लेव्हलवर ॲडव्हान्स होमिओपॅथीचा अभ्यास केला आहे. सेकंडरी डिसऑर्डर्सवर प्रभावी उपचार करण्यात त्यांना विशेष कौशल्य आहे.

ते 'आनंद पतसंस्था सहकारी'चे सचिव असून, त्यांच्या 'आनंद फाउंडेशन'च्या माध्यमातून गरजू आणि उपेक्षित रुग्णांना वैद्यकीय सेवा पुरवण्याचे कार्य ते सातत्याने करत आहेत. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल वैद्यकीय क्षेत्रासह समाजातही घेतली जात आहे.

13 एप्रिल रोजी घाटकोपर येथे झालेल्या विशेष कार्यक्रमात त्यांच्या अध्यक्षपदाची घोषणा झाली. याच दिवशी दादासाहेब फाळके चित्रपट युनियनचे अध्यक्ष श्री. अजित म्हामुणकर यांच्या हस्ते त्यांना डॉक्टर अडव्हायझर कमिटीच्या अध्यक्षपदाचा सन्मान देण्यात आला.

या दोन्ही पदांमुळे महाराष्ट्राच्या वैद्यकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात सेवा करण्याची अधिक व्यापक संधी मिळाल्याबद्दल डॉ. भामरे यांनी आभार व्यक्त करत पुढील कार्याला वचनबद्धतेची ग्वाही दिली.

## पहलगाम (काश्मीर)मध्ये हिंदूंची हत्या झाली त्या निषेधार्थ निवेदन

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी**
**रणजीत सिंह ठाकुर**

रिसोड तालुक्यातील सर्व डॉ. मंडळींनी एकजूट होऊन पहेलगाम येथे (काश्मीर) झालेल्या हिंदूंच्या हत्येच्या निषेधार्थ व ज्यांनी हा अतिरेक केला. त्यांना कळक शासन होण्यासाठी आणी त्या अतिरेक्याचा निषेध म्हणून दिनांक २८ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता जिजाऊ चौक ते तहसील पर्यंत सर्व डॉ. मंडळींनी एक होऊन निषेध रॅली काढत तहसीलदार रिसोड यांना याबाबत निवेदन सादर केले. या रॅली करता डॉ. असोसिएशन रिसोड यांनी याबाबत चा निषेध करण्यासाठी दिनांक २७ एप्रिल २०२५ रोजी पोलीस स्टेशन रिसोडचे ठाणेदार यांना परवानगी करिता निवेदन दिले. त्यामध्ये असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अशोक इंगोले, उपाध्यक्ष राजेश्वर मुलंगे, सचिव डॉ. गजानन सानप, सहसचिव डॉ. कुलदीप देशमुख, कोषाध्यक्ष अनिल तापडिया, सहकोषाध्यक्ष कैलास गायकवाड, महिला प्रतिनिधी डॉ. सरोज पायघन, डॉ. संत्रे मॅडम, शहर प्रतिनिधी डॉ. महेश खानझोडे, डॉ. राम बोडखे, डॉ. विशाल इरतकर डॉ.भीमराव पांडे, रिसोड ग्रामीण प्रतिनिधी डॉ. अनंत भाग्यवंत इत्यादी सह अनेक बोर्ड ऑफ डायरेक्टर डॉ. राधेशा व्यास, डॉ. सोमजी चौधरी, डॉ. सुभाष बाबेरवाल,डॉ. दिलीप धोपे, डॉ . रमेशचंद्र साबू, डॉ. पुरुषोत्तम बियाणी, डॉ.भारतहुंबाड, डॉ.दत्तत्रय इरतकर, डॉ.अजय पाटील डॉ. अरुण देशमुख यांच्यासह अनेक मंडळी यामध्ये उपस्थित होती. या सर्वांनी या बाबीचा निषेध करून निवेदन दिले.



## गो म वेदक विद्यामंदिर तळाच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

**दैनिक युवक आधार**
**तळा वार्ताहर**

: महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद आयोजित पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षा 9 फेब्रुवारी 2025 रोजी पार पडली. नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात गो म वेदक विद्यामंदिर तळाच्या चार विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. कु. नील कमलेश पातेरे पाचवी, तर कु सार्थक कैलास वाडीकर, कु निदाल अनिस कुरुक्कर व कु स्वस्ती संतोष अवसरे या आठवीच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना सुहास वावेकर, विनायक महाडकर, विठ्ठल रेणूकर, जयश्री मचे, जगन्नाथ बागुल, नम्रता मुतंगे, आशा मोंढे, दिव्या वडके आदी शिक्षकांनी मार्गदर्शन केले होते.

शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यार्थ्यांचे यश हे अनेकदा त्यांच्या कठोर परिश्रमाचे आणि शिक्षणावरील दृढ विश्वासाचे प्रतीक असते. या परीक्षेत यशस्वी होणारे विद्यार्थी केवळ आर्थिकदृष्ट्या सक्षम नसतात, तर ते आपल्या बुद्धिमत्ता आणि जिद्दीनेही चमकतात. शिष्यवृत्ती परीक्षा विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वपूर्ण संधी आहे. तसेच आपल्या ज्ञानाची आणि कौशल्याची परीक्षा देण्याची संधी मिळते. शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवणारे विद्यार्थी अनेकदा आपल्या शाळेचे आणि कुटुंबाचे नाव उज्ज्वल करतात. त्यांची ही यशोगाथा इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा देते. ही प्रेरणा इतर विद्यार्थ्यांनी घेणे आवश्यक आहे.



गो म वेदक विद्यामंदिर तळाच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत रोडे, उपाध्यक्ष पुरुषोत्तम मुळे, सचिव मंगेशशेठ देशमुख, शाळा समितीचे चेअरमन महेंद्रशेठ कजबजे, प्राथमिक विभागाचे चेअरमन किरणशेठ देशमुख, पन्हेळी हायस्कूलचे चेअरमन श्रीराम कजबजे, शाळेचे मुख्याध्यापक दिलीप ढाकणे, सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

## सणसरमध्ये शिवजयंती तिथीनुसार होणार साजरी

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील सणसर गावात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती परंपरने चालत आलेल्या तिथीनुसार साजरी करण्यात येत असती. यावर्षी पण शिवजयंती तिथीप्रमाणे व पारंपरिक पद्धतीने साजरी करण्यात येणार असल्याची माहिती कुलदीप निंबाळकर व राहुल जगताप यांनी दिली. यावर्षी मंगळवार दि.29 एप्रिल रोजी सकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन करून होणार आहे. दुपारी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पोवाड्याचा कार्यक्रम होणार असून संध्याकाळी पारंपरिक पद्धतीने लेझीम पथक ढोलताशा पथक, जुन्या काळातील मर्दानी खेळ दाखवून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या ची मिरवणूक सणसर गावातून काढण्यात येणार आहे. या कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्यासाठी विक्रम भैय्या निंबाळकर,गणेश भोसले,निखिल भोसले, अतुल घोडे,अमोल पाठक व जयंती उत्सवाचे जेष्ठ सदस्य रमेश सोनार,विजय शिरसट,योगेश गोरे,प्रकाश जगताप,अशोक जगताप,विकास काळे,वैभव चव्हाण,विशाल रायते,विलास रायते व सर्व सदस्य यांचे मोलाचे सहकार्य असते

## अतिरेकी हल्ल्याच्या निषेधार्थ खारघर येथे काढण्यात आला मोर्चा

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर

जम्मू-कश्मीर मधील पहलगाम येथे निष्पाप भारतीय नागरिकांवर झालेल्या अतिरेकी हल्ल्याच्या निषेधार्थ शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली खारघर येथे मोर्चा काढण्यात आला. अतिरेक्यांना पाठबळ देणाऱ्या पाकड्यांचा निषेध करण्यात आला. जनतेच्या मनात असलेला राग, प्रतिशोध घेण्याची भावना आणि पाकव्याप्त काश्मीर भारताचा भाग व्हायलाच पाहिजे ही मागणी ठामपणे मांडण्यात आली.

यावेळी महानगर प्रमुख अवचित राऊत, शिवसेना उपजिल्हा प्रमुख भरत पाटील, विधानसभा संघटक दिपक निकम, विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर, युवासेना जिल्हाधिकारी पराग मोहिते, कामोठे शहर प्रमुख रामदास गोवारी, कलंबोली शहर प्रमुख सूर्यकांत म्हसकर, संतोष गोळे, प्रशांत जांभूळकर, रामचंद्र देवरे, युवासेना तालुका अधिकारी, मनोज कुंभारकर, अजय पाटील, महिला आघाडी तालुका प्रमुख अनीता डांगरकर, कामोठे शहर प्रमुख सौ. संगीता राऊत, खारघर शहर संघटिका संपदा धोंगडे, यांच्या सह विभाग प्रमुख, शाखा प्रमुख व शिवसेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## नेवासा शहरातील जिल्हा परिषद शाळेसमोर गतिरोधक टाका - अंजुम पटेल

**दैनिक युवक आधार**
**नेवासा प्रतिनिधीः-**
**लखन वाल्हेकर**



नेवासा शहरातील जिल्हा परिषद शाळेसमोर गतिरोधक टाकण्याची मागणी काँग्रेस शहराध्यक्ष अंजुम पटेल यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली. नेवासा शहरात नेवासा श्रीरामपूर महामार्गालगत जिल्हा परिषद शाळा असून या मार्गावरून मोठ्या जलद गतीने वाहणांची ये -जा चालू असते. शाळा भरण्याच्या वेळी तसेच शाळा सुटल्यावर शाळेतील विद्यार्थ्यांना रस्ता पार करावा लागतो त्यामुळे येथून वाहतूक करणाऱ्या वाहणामुळे विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात येतो. तर शाळेतील शिक्षकांचा विद्यार्थ्यांना रास्ता पार करून देण्यासाठी मोठा कस लागतो. विद्यार्थ्यांच्या जीवास यामुळे धोका निर्माण झाला आहे. या सर्वांची दखल घेत काँग्रेसचे शहराध्यक्ष अंजुम पटेल यांनी आज सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपाभियंता सुरेश दुबाळे यांची भेट घेत जिल्हा परिषद शाळेसमोर तातडीने गतिरोधक टाकण्याची मागणी केली. त्वरित गतिरोधक न टाकल्यास कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्याचा ईशाराही यावेळी त्यांनी दिला. तर उपअभियंता दुबाळे यांनी त्वरित गतिरोधक टाकण्यात येईल असे स्पष्ट केले. निवेदनावेळी शहराध्यक्ष अंजुम पटेल, उपाध्यक्ष कैलास बोर्डे, संदीप मोटे. आदी उपस्थित होते.

नेवासा शहरातील शाळेतील विदयार्थ्यांच्या रक्षणाची जबाबदारी ही आपले कर्तव्य असून शाळेसमोर गतिरोधक टाकणे हाच एकमेव पर्याय या ठिकाणी आहे. तातडीने गतिरोधक टाकले नाही तर कडक भूमिका शहर काँग्रेस कडून घेतली जाईल - *अंजुम पटेल*, शहराध्यक्ष नेवासा शहर काँग्रेस

## शिर्डीत काव्यगंध २ रे राज्यस्तरीय कविसंमेलन थाटात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**कवी सरकार इंगळी**




शिर्डी नगरीत रविवारी, २७ एप्रिल रोजी 'काव्यगंध २ रे राज्यस्तरीय कविसंमेलन' अत्यंत उत्साहात पार पडले. शांतिकमल हॉलमध्ये आयोजित या भव्य सोहळ्याला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून साहित्यप्रेमी, कवी व कवयित्री मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. या कविसंमेलनात तब्बल ७५ कवी व कवयित्रींनी सहभाग घेतला होता. सर्वांनी आपल्या दर्जेदार कविता व गझल सादरीकरणातून रसिकांची मने जिंकली. रसिक श्रोत्यांनीही आपल्या टाळ्यांनी सर्व सादरीकरणाचे मनःपूर्वक स्वागत केले. संपूर्ण शिर्डी नगरीत या काव्य महोत्सवाची विशेष चर्चा होती.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. भारत सातपुते सरांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून रज्जाक शेख, अमोल चिने आणि नवनाथ शिंदे उपस्थित होते. तसेच लक्षवेधी उपस्थिती म्हणून कवि सरकार इंगळी, सुमनताई मुठे, विलास बाबर, शरदचंद्रजी काकडेदेशमुख आणि वैभव धर्माधिकारी यांची उपस्थिती भावली. 'काव्यगंध साहित्य मंच' व 'काव्यगंध प्रकाशन' यांच्या संयुक्त विद्यमाने या कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी जयराम पारधी, डॉ. धनंजय जगताप आणि संतोष जाधव यांनी संयोजनाची भूमिका बजावली. तसेच आयोजक म्हणून अड. अक्षशिला शिंदे आणि प्रशांत गोरे यांचे मोलाचे योगदान लाभले.कार्यक्रमात विविध प्रकारच्या कविता, गझल सादरीकरणाचे सुंदर सत्र रंगले. अनेक कवी कवयित्रींनी आपल्या साहित्यकृतींमधून जीवनातील विविध पैलूंना स्पर्श केला. काहींनी सामाजिक विषयांवर जळजळीत भाष्य केले, तर काहींनी प्रेम, निसर्ग व संस्कृती यावर भावपूर्ण कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली.अध्यक्षीय भाषणात भारत सातपुते सरांनी कार्यक्रमाचे विशेष कौतुक केले. त्यांनी आपल्या भाषणात म्हटले, "या कविसंमेलनाने अखिल भारतीय स्तरावरील संमेलनांनाही लाजवेल अशी उंची गाठली आहे. प्रतिभावान कवी-कवयित्रींच्या सादरीकरणामुळे शिर्डीतील काव्यप्रेमींची मनं मंत्रमुग्ध झाली आहेत."शिर्डीतील साहित्यिक वातावरण अधिक समृद्ध करणाऱ्या या कार्यक्रमाने रसिकांच्या मनात दीर्घकाळ ठसा उमटवला. कविसंमेलनाचे सर्वच उपस्थितांनी भरभरून कौतुक केले असून पुढील वर्षीही अशीच भव्य मेजवानी होण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

## हजारो समर्थकांसह भाजपात; काँग्रसनेते कृष्णाशेठ पारंगे अनेक समर्थकांसह भाजपमध्ये

**पान १ वरून** मंडल दशरथ म्हात्रे, तळोजा मंडल दिनेश खानावकर, कर्नाळा मंडल मंगेश वाकडीकर, उलवा मंडल रुपेश धुमाळ, उरण शहर मंडल प्रसाद भोईर, उरण ग्रामीण मंडल धनेश गावंड, कर्जत शहर मंडल राजेश लाड, कर्जत ग्रामीण मंडल दिनेश रसाळ, खालापूर पश्चिम मंडल प्रवीण मोरे, खालापूर पूर्व मंडल सनी यादव, खोपोली मंडल राहुल जाधव, नेरळ मंडल नरेश मसणे यांचा या सोहळ्यात लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रभूअण्णा यांच्या सोबत वाहतूक संघटनेचे उपाध्यक्ष अतुल मारुती घरत, कार्याध्यक्ष विजय भोईर, माजी नगरसेविका प्रिया भोईर, प्रदेश खजिनदार भूषण म्हात्रे, कोन ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अशोक म्हात्रे, माजी पंचायत समिती सदस्य गुरुनाथ ठाकूर, समीर दळवी, ग्रामपंचायत सदस्य गोरख धुमाळ, विश्वनाथ शेळके, विशाल घरत, पनवेल तालुका वाहतूक अध्यक्ष प्रभाकर नाईक यांचासह शेकापच्या हजारो कार्यकर्त्यांनी तसेच कृष्णाशेठ पारंगे यांच्यासोबत चांभार्ली ग्रामपंचायतीचे सरपंच प्रतिप पाटील, दापिवलीचे सुरेश गाताडे, देवळोलीचे माजी सरपंच रोहिदास पाटील, ग्रामपंचायत सदस्य सचिन चाळके, समीर दळवी, ललिता पडवळ, किशोर शिंदे, आनंद चव्हाण, प्रल्हाद शिंदे, मनसेचे बारवई अध्यक्ष सचिन पडवळ यांच्यासह त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांनी भाजपात जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे पनवेलमध्ये शेकापला तर खालापूर तालुक्यात काँग्रेसला मोठे खिंडार पडले आहे.

## नाटक- सिनेमाकडे बघण्याचा दृष्टिकोन नक्कीच बदलेल

### अभिनेते अभिजीत झुंजारराव यांचे प्रतिपादन बालनाट्य शिबिराचा शुभारंभ

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार**

**चिपळूण (प्रतिनिधी)--**: अखिल भारतीय नाट्य परिषद शाखा चिपळूणच्यावतीने आयोजित बालनाट्य शिबिरात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांमधून सर्वचजण अभिनेते होणार नाहीत, परंतु नाटक कसं बघावं, सिनेमा कसा बघावा, याकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन मात्र नक्कीच बदलेल, यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होईल, असा विश्वास अभिनेते, लेखक, दिग्दर्शक अभिजित झुंजारराव यांनी व्यक्त केला.



अखिल भारतीय नाट्य परिषद शाखा चिपळूणच्यावतीने येथील इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्रात २७ एप्रिल ते ५ मे या कालावधीत बालनाट्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन रविवारी मुख्याधिकारी विशाल भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. या वेळी नाट्य परिषद शाखा चिपळूणचे अध्यक्ष डॉ. प्रशांत पटवर्धन, प्रशासकीय अधिकारी मंगेश पेढांबकर, रंगकर्मी दिलीप आंब्रे आदी उपस्थित होते. या वेळी मुख्याधिकारी विशाल भोसले यांनी या बालनाट्य प्रशिक्षणाला शुभेच्छा दिल्या. नाट्य परिषदेच्या उपक्रमांना नगर पालिकेचे सहकार्य असते. यापुढेही तसेच राहील, असेही त्यांनी या वेळी सांगितले. उपस्थित मान्यवरांचे स्वागत अड. विभावरी रजपूत, दिलीप आंब्रे, मनीषा दामले, छाया पोटे यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्ष डॉ. प्रशांत पटवर्धन यांनीही या वेळी आपले मनोगत व्यक्त करताना नाट्य परिषदेच्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला, तसेच अभिजित झुंजारराव यांच्यासारखा तरुण मार्गदर्शक या विद्यार्थ्यांना लाभला आहे. त्यामुळे निश्चितच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. दीपप्रज्वलन व नटराज पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक योगेश बांडागळे यांनी केले. माजी नगरसेवक रामशेठ रेडीज व विश्वास पाटील यांनी शिबिराला उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संगीता जोशी यांनी केले, तर आभार डॉ. मिनल ओक यांनी व्यक्त केले. अपर्णा नातू, संजय कदम, संगीता पालकर, प्राची जोशी, मनीषा दामले, मंगेश बापट, श्रीकांत फाटक, समिधा बांडागळे आदींनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

## पनवेल तालुक्यात १३ प्राथमिक ग्रामीण आणि माध्यमिक ग्रामीण अनधिकृत शाळा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पनवेल तालुक्यात तेरा प्राथमिक ग्रामीण आणि माध्यमिक ग्रामीण शाळांची यादी पंचायत समिती पनवेल शिक्षण विभागाने प्रसिद्ध केली आहे. करंजाडे परिसराचा झपाट्याने विकास होत असल्याने या परिसरात अनधिकृत शाळांची संख्या जास्त आहे. तालुक्यातील ग्रामीण भागात शासनाची कोणतीही परवानगी/ मान्यता न घेता या शाळा सुरू केलेल्या आहेत. या शाळांना शासनाची मान्यता नाही. त्यामुळे या शाळा अनधिकृत शाळा असल्याचे पंचायत समिती पनवेल या कार्यालयाकडून जाहीर करण्यात आल्या आहेत. पालकांनी या शाळेत आपल्या पाल्यांचा प्रवेश घेऊ नये असे आवाहन गटशिक्षणाधिकारी सिताराम मोहिते यांनी केले आहे.

अनधिकृत शाळा प्राथमिक ग्रामीण

१)आकृती एज्युकेशन अँड वेलफेअर सीएसएमबी इंटरनॅशनल स्कूल, उलवे
२) न्यु इंग्लिश स्कुल, नेरे
३) किड्स गार्डन पब्लिक स्कूल, टेमघर
४) एस.जी.टी. इंटरनॅशनल करंजाडे, आर 1
५) साईगणेश एज्युकेशन सोसायटी नवजीवन इंटरनॅशनल स्कूल, खारपाडा
६) वेदिक ट्री इंटरनॅशनल स्कूल, करंजाडे सेक्टर 3
७) वेदगृह इंटरनॅशनल स्कूल, करंजाडे सेक्टर 4
८) दि बुध्दीष्ट इंटरनॅशनल स्कूल, ओवळे
९)सनराईस इंग्लिश स्कूल, वावंजे

**अनधिकृत शाळा माध्यमिक ग्रामीण**

१)दि बुध्दीष्ट इंटरनॅशनल स्कूल, आर 1, करंजाडे,
२)कै. मंजुळा त्रिंबक (साखरेशेठ) ठाकूर इंग्रजी माध्यम शाळा-पाले ब्रुदुक कोळवाडी
३)ज्ञानाई माध्यमिक विदयालय धामणी-वाजे
४) न्यु इंग्लिश स्कूल कोपरा

## पावसाळ्यापूर्वीच्या तयारीचा आढावा; वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात करण्यात येणाऱ्या तयारीचा आढावा घेण्यासाठी वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला नवी मुंबई महानगरपालिका (NMMC), पोलीस विभाग, सिडको, महानगर गॅस, महावितरण (MSEDCL) तसेच इतर संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.बैठकीत पावसाळ्याच्या दृष्टीने करण्यात आलेल्या तयारीचे सविस्तर सादरीकरण करण्यात आले. शहरातील नालेसफाई, जलनिकासी व्यवस्था, खड्ड्यांची दुरुस्ती, आपत्कालीन प्रतिसाद पथकांची तयारी, विजेच्या तारांचे निगडीत धोके, गॅस पाइपलाइनच्या सुरक्षेचे नियोजन, वाहतूक व्यवस्थापन आणि आपत्कालीन मदत सेवा याबाबत आढावा घेण्यात आला. बैठकीदरम्यान वनमंत्री गणेश नाईक यांनी सर्व यंत्रणांकडून आत्तापर्यंत झालेल्या कामांचा आढावा घेतला आणि येत्या दिवसांत पावसाच्या तडाख्याचा सामना करण्यासाठी आणखी सज्ज राहण्याचे स्पष्ट निर्देश दिले."यंत्रणा सज्ज आहेत हे समाधानकारक असले तरी पावसाळयात कुठलीही अडचण निर्माण होऊ नये म्हणून सतर्क राहणे अत्यंत आवश्यक आहे," असे ते म्हणाले. "महत्वाचे निर्देश" नालेसफाईचे काम पूर्णत्वास नेण्यास प्राधान्य देणे. जलभरावाच्या संभाव्य ठिकाणी जलनिकासी यंत्रणा सज्ज ठेवणे. आपत्कालीन नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत ठेवणे.महावितरण व महानगर गॅसने आपापल्या सुविधा सुरक्षित ठेवण्याबाबत विशेष खबरदारी घेणे.नागरिकांना योग्य वेळी अलर्ट व मदत मिळण्यासाठी सर्व विभागांमध्ये समन्वय साधणे. बैठकीमध्ये, विशेषतः मुसळधार पावसामुळे शहरात होणाऱ्या संभाव्य जलभराव व वाहतूक कोंडीचा विषयही चर्चिला गेला. यासाठी वाहतूक विभागाने स्वतंत्र नियोजन करावे व नागरिकांना पर्यायी मार्गांची माहिती वेळोवेळी देण्याचे निर्देशही देण्यात आले.




वनमंत्री गणेश नाईक यांनी शेवटी सर्व विभागांना आवाहन केले की, नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी आणि शहर सुरक्षित राहण्यासाठी संपूर्ण पावसाळ्यात जागरूकतेने व उत्तरदायित्वाने कार्य करावे.

## डोंगरगांव येथे सामाईक विहीर आणि दोन गुंठे जमीन नावावर करुन देण्यावरुन वाद

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**विंचूर :-** डोंगरगांव येथील भाऊसाहेब खंडु उगलमुगले (वय ४३) यांना बाळासाहेब उगलमुगले, प्रकाश उगलमुगले, गोरख उगलमुगले, सचिन उगलमुगले,प्रतिक उगलमुगले, गणेश उगलमुगले व इतर दोन यांनी गैर कायद्याची मानस जमवुन विहीरीच्या कामापैसे मागुन जमिन नावावर करुन दे असे बोलुन मारहान केल्याबद्दल यांच्या विरोधात लासलगा व पोलीस ठाणे गु.राज.ना. दंगा/दुखाप त निरंक ११५/२०२५ भा. न्याय संहिता कलम १८९(२), १९१(२), १९१(३), १९०, ११८(१), ११५(२), ३५१, (२), ३५१ (३),३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



यातील फिर्यादी व आरोपीत मजकुर हे नात्याने एकमेकांचे भाऊबंद असुन त्यांचेत सामाईक विहीरीचे कामावरुन व दोन गुंठे जमीन आरोपीतांचे नावावर करुन देण्यावरुन वाद आहेत फिर्यादी व साक्षीदार हे त्यांचे शेतात काम करीत असतांना व.ता.वेळी व ठिकाणी यातील आरोपीत मजकुर यांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन फिर्यादी व साक्षीदार यांचेशी विहीरीचे कामाचे पैसे मागुन व जमीन आमच्या नावावर करुन दे असे बोलुन त्यांचेशी वाद घालुन फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करुन हातात लाकडी दांडके, पावडे घेवुन फिर्यादी व त्यांचे वडील यांचे डोक्यावर मारुन तसेच फिर्यादीची पत्नी सविता हिच्या डाव्या हातावर, डोक्यावर, पाठीवर मारले तसेच फिर्यादीची मुले यांना पण लाकडी दांडक्याने हातापायावर, पाठीवर मारहाण करुन दुखापत केली तसेच तुम्ही जर परत तुमच्या शेतात पाय ठेवला तर तुमचा मुडदा पाडु असा दम दिला वगैरे मजकुराच्या फिर्यादीवरुन गुन्हा रजि. दाखल करण्यात आला असुन पुढील तपास सपोनि भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अंमलदार पो.हवा. २७७/ कांदळकर हे तपास करीत आहेत

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

**daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

# वाढोणा (बाजार) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र लिपीकाच्या हलगर्जीपणामुळे दुरावस्थेत

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**

राळेगावः-तालुक्यातील वाढोणा(बाजार) येथे शासनाने ४.५ करोड खर्च करून रुग्णांच्या सेवेसाठी इमारत बांधलेली आहेत,पण तिथे रुग्णांना पिण्यासाठी पाणी नाही आहे. २ आरो फिल्टर मशीन असून बंद पडलेल्या अवस्थेत आहे एखाद्या रुग्णाला ताबडतोब पाण्याची आवश्यकता भासल्यास विना, पाण्यामुळे त्याला मरणाच्या दारात गेल्याशिवाय राहणार नाही याला जबाबदार कोण? लिपीक यांना विचारणा केली असता त्यांनी बातमी लावून द्या असे प्रतिउत्तर




देण्यात आले . लिपीक यांना बातमी प्रकाशित करण्याआधी पाण्याबद्दल विचारले असता,त्यांनी विहिरीला पाणी नाही सांगितले पण विहीरीची पाहणी केली तर अंदाजे १५ ते २० फुट पाणी आढळून आले.या पद्धतीत लिपीक हा उडवाउडवीची प्रतिउत्तरे देत होता उन्हाळ्याचे दिवस असुन त्यात ४५-४६ एवढे तापमान असून रुग्णांना फिल्टर थंड पाण्याची व्यवस्था होत नसेल तर त्या रुग्णाची दयनीय अवस्था झाल्याशिवाय राहणार नाही. यात बाहेर गावच्या रुग्णांना भरती ठेवतात त्यांच्यासाठी पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण होतो आणि फिल्टर आरो दुरुस्ती साठी आमच्या कडे कोणताही निधी आमच्या कडे आला नाही असे सांगितले.दवाखान्याची स्वच्छता एवढी दुर्गंधी आहेत की दवाखान्यात गेलेला रुग्ण हा घरी आला तर त्याची प्रकृती जास्त होते की काय या पद्धतीत दुर्गंधी पसरली आहे.याच पद्धती फ्रिज मशीनची पाहणी केली असता ३-४ प्रकारचे किटक बघण्यास मिळाले यात रूग्णांना कमी अधिक झाल्यास याला जवाबदार कोण?असा प्रश्न रूग्णांमध्ये होत आहे. लिपीक यांच्या बोलण्यावरून असे आढळले की आरोग्य केंद्राचा कारभार वैद्यकीय अधिकारी न पाहता लिपीक करतात यावरून असे निदर्शनास येत आहे की, येथील वैद्यकीय अधिकारी यांचे आरोग्य केंद्रावर दुर्लक्ष केले जात आहे. सदर जिल्हा आरोग्य अधिकारी व मुख्यकार्यकारी अधिकारी आणि प्रशासनाने या प्राथमिक आरोग्य केंद्राकडे लक्ष देण्याची मागणी परीसरातून होतांना दिसून येत आहे.

## शिष्यवृत्ती परीक्षेत श्री शिवाजी विद्यालय रिठद चे घवघवीत यश.

दैनिक युवक आधार
रिसोड तालुका प्रतिनिधी
रणजीत सिंह ठाकुर

शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम ठेवत याही वर्षी सत्र 2024-25 मध्ये श्री शिवाजी विद्यालय रिठद च्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. शिष्यवृत्ती परीक्षेत (इयत्ता 5वी चे ) 8 विद्यार्थी पात्र झाले असून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, लोकप्रिय शिक्षक आमदार आदरणीय किरणरावजी सरनाईक साहेब तसेच शिक्षण संस्थेचे संचालक आदरणीय स्नेहदीप भैय्या साहेब सरनाईक यांनी विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन व कौतुक केले.

शिष्यवृत्ती परीक्षा पात्र विद्यार्थी --गणेश बबन बिटोडे ,कार्तिक शिवाजी खरसडे , कु मोनिका जयराम बिटोडे , कुमारी प्राजक्ता नंदकिशोर जटाळे , प्रेम जगदीश शिंदे , कु. प्रेरणा कपिल बनसोड, कु. पूर्वी उमेश गवई , कु.श्रद्धा दिलीप गोंडे . या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन करून श्री शिवाजी विद्यालयाचे नावलौकिक केले असे प्रतिपादन आदरणीय प्राचार्य श्री एस. आर. घुगे, पर्यवेक्षक श्री आर बी भिसडे यांनी केले तसेच या घवघवीत यशात विद्यालयातील सर्व शिक्षक बंधू भगिनी यांचा मोलाचा वाटा असून भविष्यातही अशीच घोडदौड सुरूच राहील.




# कार्यकर्ता हा संघटनेचा कणा; कार्यकर्त्यांनी जोमाने सभासद नोंदणी करावी- ना. अजितदादा पवार

### सावर्डे येथे राष्ट्रवादी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ता संवाद मेळावा

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार**
**चिपळूण प्रतिनिधी**

राजकीय संघटन असेच वाढत नाही. त्यातील कार्यकर्ता हा संघटनेचा कणा आहे. तो नेहमी कार्यमग्न असायला हवा. संघटनेच्या सभासद नोंदणी जाती धर्माला स्थान देऊ नका. मीपणा आणि गर्विष्ठपणा दाखवू नका. कार्यकर्त्यांनी जोमाने सभासद नोंदणी केली तरच येणाऱ्या निवडणूका सोप्या जाणार आहे. आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीसाठीचे अधिकार जिल्हा पातळीवरच पदाधिकाऱ्यांना राहतील, घड्याळाच्या चिन्हावरच या निवडणूका लढवायच्या आहेत. त्यादृष्टीने तयारीला लागा, असे आवाहन उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी सावर्डेतील संवाद मेळाव्यात केले. चिपळूण संगमेश्वर दौऱ्यावर आलेल्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत रत्नागिरी जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्याचा संवाद मेळावा रविवारी सावर्डे येथे झाला. मेळाव्याच्या सुरवातीस आमदार शेखर निकम म्हणाले, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चिपळूण संगमेश्वर मतदार संघात विकास कामांना चालना देण्याची भूमिका घेतल्याने २६०० कोटींची विकास कामे करता आली. यापुढील काळात संघटना अधिक मजबूत व्हायला हवी. केवळ विकास कामे करून चालत नाही. त्यासाठी कार्यकर्त्यांनी जनसंपर्क वाढवायला हवा. येणाऱ्या ग्रामपंचायत निवडणूकांवर बारकाईने लक्ष ठेवायला हवे. महायुती होईल आपण सहज निवडून येऊ या




भ्रमात राहू नका. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीसाठी जे उमेदवार इच्छूक आहेत, त्यांनी आतापासूनच तयारी सुरू करावी. विरोधकांशी तितकेच चांगले संबंध ठेवावेत. पक्षातील इतर इच्छूकांशी देखील सलोख्याचे संबंध ठेवावेत. जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पहिल्या नंबरवर राहील, यासाठी सर्वानी योगदान द्यावे. जिल्हाध्यक्ष बाबाजी जाधव यांनी आगामी काळात आमदार शेखर निकम यांना मंत्रीमंडळात संधी देण्याची मागणी केली. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, प्रत्येकाचा एक काळ असतो. याआधी यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शरद पवार, विलासराव देशमुख आदी मंडळींचा काळ होता. आता आपला काल आहे. तेव्हा मीपणा न जपता समाजातील प्रत्येक घटकात समाविष्ठ होऊन सामज्यंसपणे त्यांच्याशी वागा. आत्याच्या निवडणूका या हलक्यात घेऊ नका. कार्यकर्ता व पदाधिकाऱ्यांनी आतापासूनच झटून कामाला सुरवात करावी. आपल्या नगरात, प्रभागात एवढेच नव्हेतर कुटुंबातीलही व्यक्तींना पक्ष कार्यात जोडण्याचा प्रयत्न करा, असे आवाहनही पवार यांनी केले. लाडकी बहिण योजनेवरून पवार म्हणाले, विरोधक सातत्याने ही योजना बंद होईल अशी अफवा परसवत आहे. मात्र राज्य सरकार कदापी ही योजना बंद करणार नाही. ज्या महिलांचे अडिच लाख उत्पन्न आहे, इतर कोणत्याही योजनेचे लाभ घेत नाहीत, अशा महिलांना ही योजना सुरूच राहणार असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना अजित पवारांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. तरूणांच्या हाताला काम मिळावे, त्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आमदार निकम यांनी पुढाकार घेत नोकरीविषयक ॲपची निर्मीती केली, त्याचे उदघाटन अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी सभापती पूजा निकम, शौकत मुकादम, दादा साळवी, जयंद्रथ खताते, नितीन ठसाळे, मिलींद कापडी, दिशा दाभोळकर, निलेश कदम आदी उपस्थित होते.

## अवैद्य रेतीची वाहतूक करणारी बोलेरो(मालवाहतूक) जप्त

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी :-**
**जितेंद्र खोडे**

**राळेगावः-** तालुक्यात रेती तस्करीला चाप लावण्यासाठी पोलिस प्रशासनाने धडाकेबाज मोहीम सुरू केली आहे. वडकी पोलिसांनी रेतीची अवैध वाहतूक करणाऱ्या एका मालवाहू मॅक्स पिकअप वाहनाला जप्त केले. मात्र, कारवाया सुरू असतानाही तस्करांचा उन्मत्तपणा कायम असल्याचे दिसून येते. तालुक्यातील वडकी येथे रविवार, दि २७ एप्रिल रोजी दुपारी ४.०० वाजता रेतीची अवैध वाहतूक करणाऱ्या मॅक्स पिकअप वाहनावर कारवाई करण्यात आली. मॅक्स पिकअप चालकाकडे उपलब्ध रेती वाहतूक पासमधील माहिती आणि प्रत्यक्ष रेती टाकण्याच्या ठिकाणात विसंगती आढळल्याने ठाणेदार सुखदेव भोरकडे यांनी १ब्रास रेतीसह मालवाहू मॅक्स पिकअप (क्रमांकः एमएच ३६/एए २२८३) जप्त करून तो वडकी पोलिस ठाण्यात लावला. या कारवाईत पोलिसांनी १ ब्रास रेती किंमत ६हजार रुपये व मॅक्स पिकअप वाहन किंमत ५ लाख रुपये असा एकंदरीत ५ लाख ६ हजाराचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी संशयित आरोपी अविनाश हनुमान सराटे (वय ३६) याचेवर विविध कलमाखाली वडकी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई ठाणेदार सुखदेव भोरकडे यांच्या मार्गदर्शनात बिट जमादार संदीप मडावी व विनोद नागरगोजे यांनी केली आहे.




## वडकी येथे अवैद्यरीत्या गोवंश वाहतूक करणारे वाहन जप्त पोलीसांची धडक कारवाई

### १२ जनावरांची सुटका

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**



**राळेगावः-** तेलंगणा राज्यातील हैदराबाद येथे ट्रकमध्ये जनावरे कोंडून वाहतूक करणाऱ्या वाहनाला अडवून पोलिसांनी १२ गोवंशीय बैलाची सुटका केली. यात ट्रक जप्त करून वाहनचालकासह एका जणांविरुद्ध वडकी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिसांनी वडकी येथे रविवार, दि २७ एप्रिल रोजी दुपारी ३ च्या दरम्यान केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार नागपूरवरून हैदराबाद राष्ट्रीय महामार्गाने जनावरांची अवैध वाहतूक होत असल्याची गोपनिय माहिती वडकीचे ठाणेदार सुखदेव भोरकडे यांना मिळाली. या माहितीवरून पोलिसांनी वडकी येथील राष्ट्रीय महामार्गावर सापळा रचला. याच दरम्यान नागपूर येथून येणाऱ्या आयशर ट्रक (क्रमांक एम. एच. ४०, सी. एम. ३२३०) या ट्रकची पोलिसांनी झडती घेतली असता त्यात १२ गोवंशीय बैल आढळून आले. याप्रकरणी पोलिसांनी आयशर ट्रक जप्त करून या कारवाईत जप्तीतील ट्रक किंमत २० लाख व १२ गोवंश बैल किंमत २ लाख ४० हजार रुपये, एकंदरीत २२ लाख ४० हजार किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. सदर कंटेनर जप्त करून यातील आरोपी आबिद नूर कुरेशी (२६) रा. नागपूर, जगदीश भीमराव लिंगायत (३७) रा. नागपूर यांना अटक करून त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कलम ५,५ अ, ५ब, प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११ घ, ड तसेच महाराष्ट्र पोलिस अधिनियम कलम ११ अन्वये वडकी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरची कारवाई ठाणेदार सुखदेव भोरकडे, पोलिस उपनिरीक्षक प्रशांत जाधव, पोलिस कर्मचारी संदीप मडावी, दीपक वांड्रस्वार व विनोद नागरगोजे यांनी केली आहे.

# पाटोदा येथील जामिया इस्लामिया बहरुल उलुम मदरश्याचा विद्यार्थी हस्सान अन्सारी जामखेड तालुक्यातून शिष्यवृत्ती परीक्षेत प्रथम

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** पाटोदा येथील जामीया इस्लामिया बहरुल उलुम पाटोदा या मदरश्यातील विद्यार्थी व जामखेडच्या ताज मस्जिद चे धर्मगुरू कारी मुबीन अन्सारी यांचे चिरंजीव हस्सान अन्सारी याने सन-२०२३-२०२४ नुकत्याच झालेल्या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये जामखेड तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय यशाबद्दल मदरसा पाटोदा येथे त्याचा भव्य सत्कार करण्यात आला. सन-२०२३-२४ मध्ये वर्ग ८ वी च्या शिष्यवृती परीक्षेत जामखेड तालुक्यातून प्रथम आलेला हस्सान अन्सारी याचा सत्कार करण्यात आला. या वेळी सेवा सोसायटीचे संचालक सज्जाद सय्यद, ॲड.जब्बार पठाण, ॲड.सय्यद वहाब, सय्यद सरफराज, मौलाना पठाण अक्रम,



हाजी सय्यद मजहर, पठाण बरकतखान प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या सत्कार साठी हस्सान चे वडील कारी मुबीन अन्सारी यांची उपस्थिती होती. या प्रसंगी मौलाना पठाण अक्रम यांनी आपल्या भाषणात हस्सान अन्सारीच्या यशाचे कौतुक केले. आणि इतर विद्यार्थ्यांना देखील प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. सेवा सोसायटीचे संचालक, सामाजिक कार्यकर्ते सय्यद सज्जाद यांनी बोलतांना सांगितले की, मदरशा मध्ये मराठी, इंग्रजी, गणित विषयाचे चांगले शिक्षण दिले जाते. सातत्याने परिश्रम केल्यास कोणती ही मोठी कामगिरी शक्य आहे. ॲड जब्बार पठाण यांनी सांगितले की, मुलांनी स्पर्धा परीक्षा च्या अभ्यास केला पाहिजे. त्या साठी लागणारे पुस्तक उपलब्ध करून देऊ व मदरसा मध्ये जे सहकार्य लागेल ते आम्ही करू असे सांगितले. ॲड. सय्यद वहाब यांनी बोलतांना सांगितले, मुलांना धार्मिक शिक्षण बरोबर आधुनीक शिक्षण देखील गरजेचे आहे. मुलांनी चांगला अभ्यास केला पाहिजे या ठिकाणी जे सहकार्य लागेल ते आम्ही नक्कीच करू असे सांगितले. मुफ्ती जफर साहब यांनी पाटोदा मदरसा मध्ये मुलांची तयारी कशी करून घेतली जाते. याची माहिती सांगितली येथील विद्यार्थी मोठ्या पदावर जातील. अशी मला आशा आहे तसेच हस्सान ला इंग्रजी विषयाचे शिक्षण देणारे सलीम तांबोळी सर यांचे हि सर्वांनी कौतुक केले. या वेळी प्रा.सचिन गायकवाड यांनी हस्सान अन्सारी यांचे कौतुक केले. मुलांना मार्गदर्शन केले तसेच प्रमुख पाहुणे यांनी या ठिकाणी सर्व शिक्षकांचे मेहनतीचे कौतुक केले. या वेळी उपस्थित सर्वांनी टाळ्यांच्या गजरात हस्सान अन्सारीचे अभिनंदन केले. हस्सानच्या यशामुळे जामीया इस्लामिया बहरुल उलुम पाटोदा संस्थेचे नाव उंचावले आहे. या वेळी मुफ्ती जफर साहेब मौलाना मोईज, मौलाना मजहर, मौलाना आरबाज, मौलाना जहुर, पठाण चॉद खान हुसैन खान तसेच मराठी विषयाचे शिक्षण देणारे अमजद खान पठाण सर व इंग्रजी, गणित विषयाचे शिक्षण देणारे प्रा.सचिन गायकवाड सर, अय्युब मोमिन, अमजद खान पठाण हजर होते.

# रसायनी परिसरात दिवसेंदिवस अपघातांचे प्रमाण वाढत असल्याने ही बाब चिंताजनक व.पो.नि. संजय बांगर

### अपघातांचे प्रमाण टाळण्यासाठी व पुढील उपाय योजनेसाठी सा.बां.विभाग व प्रादेशिक परिवहन विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत स.पो.नि. प्रमोद जाधव यांनी केला पाहणी दौरा

**दैनिक युवक आधार**
**रसायनी आनंद पवार**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याने ही बाब अत्यंत चिंताजनक व गंभीर असल्याचे रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांनी प्रतिनिधींशी बोलताना सांगितले. रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगाने वाहन चालवणे, वाहतुकीच्या नियमांचे पालन न करणे अशा घटनेमुळे अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत आठवड्याभरात मोटर सायकलस्वार दोन तरुणांचा अपघाती दुर्दैवी मृत्यू झाला. भरधाव वेगाने वाहन चालवणे रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करणे वाहतूक नियमांचे पालन न करणे अशा कारणांमुळे अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याने यावर उपाययोजना करण्याकरिता रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली रसायनी



पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद जाधव यांनी तात्काळ सार्वजनिक बांधकाम विभाग व प्रादेशिक परिवहन विभाग यांना प्रत्यक्ष बोलवून राज्य मार्ग क्रमांक १०५ रसायनी कॉर्नर ते सावळा(कोन) या मार्गावर अपघाताचे प्रमाण टाळण्यासाठी काय उपाययोजना केल्या पाहिजेत या संदर्भात सखोल चर्चा करून रसायनी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद जाधव यांनी प्रादेशिक परिवहन विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाला सूचना दिल्यात. सावळे गावचे प्रवेशद्वारा जवळ रस्त्यावर दोन्ही बाजूला स्पीड ब्रेकर,दोन्ही वळणांवर रेम्ब्लर स्पीड ब्रेकर आणि आरसा तसेच रस्त्यावर कॉशनरी बोर्ड,व्हाईट पट्टी व कॅट आईस रिफ्क्अर, रस्त्यावरील साईट पट्टीला भराव टाकण्यात यावा याविषयी सविस्तर चर्चा करून यापुढे होणारे अपघात टाळण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने उपाययोजना करावी असे यावेळी सांगण्यात आले.सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अनागोंदी कारभारामुळे ठिकठिकाणी रस्त्याची दुरावस्था झाली आहे काही ठिकाणी स्पीड ब्रेकर टाकले आहेत तर त्यावर साईट पट्टी मारली नाही.रस्त्याच्या साईट पट्टीवर भराव नाही.रस्त्यावर काही ठिकाणी खड्डे पडले आहेत ते वेळेवर बुजवले जात नाही अशा एक ना अनेक तक्रारींचा पाढा ग्रामस्थांनी प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केला.सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कारभाराविषयी ग्रामस्थांनी थेट जिल्हाधिकारी व संबंधित विभागांना निवेदन दिले होते. ग्रामस्थांच्या भावना ओळखून रसायनी पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग व प्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलावून या गंभीर समस्यां विषयी त्वरित तोडगा काढावा असे सुचित करण्यात आले.यावेळी सार्वजनिक बांधकाम विभाग पनवेलच्या उज्वला गायकवाड, प्रादेशिक परिवहन विभागाचे महेश माने, मोटार वाहन निरीक्षक विजया चामे,असिस्टंट मोटर वाहन निरीक्षक यांच्यासह वावेघर, सावळे येथील स्थानिक ग्रामस्थ घटनास्थळी उपस्थित राहून परिस्थितीची माहिती संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली.याप्रसंगी विष्णू चव्हाण,काशिनाथ कांबळे,विठ्ठल राठोड ज्ञानेश्वर माळी,चंदर राठोड आदी ग्रामस्थ उपस्थित होते. चौकटः दांड मोहोपाडा, कोन सावळा रस्त्यावर ज्या ज्या ठिकाणी रस्त्यावर अडचणी उद्भवत आहेत सामान्य नागरिकांना वाहन चालकांना जो त्रास होत आहे त्यावर लवकरच त्वरित उपाययोजना करून हा प्रश्न मार्गी लावू
उज्वला गायकवाड
इंजिनीयर सां.बा.पनवेल

# शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त स्वस्तिका

### घोषचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून कौतुक

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

महाराष्ट्रातील प्रतिष्ठित शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराने टेबल टेनिसपटू स्वस्तिका घोष हिला नुकताच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि राज्यपाल सी पी राधाकृष्ण यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मानित करण्यात आले असून पुरस्कार मिळाल्यानंतर आज स्वस्तिका घोष हिने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट आशीर्वाद घेतले. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वस्तिकाचे अभिनंदन करून तिला पुढील यशस्वी वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.



आंतरराष्ट्रीय खेळाडू स्वस्तिका घोष ही जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सीकेटी कॉलेजची विद्यार्थिनी आहे. खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात (स्वायत्त) बीएमएसचे शिक्षण घेत आहे. स्वस्तिकाने देशात व परदेशात झालेल्या टेबल टेनिस स्पर्धेत चमकदारी कामगिरी करीत देशाचे नाव उंचाविले असून गेल्या दहा वर्षांपासून ती महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व करीत आहे. स्वास्तिकाचे वडील संदीप घोष हे या खेळातील तिचे प्रशिक्षक असून टेबल टेनिससाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वस्तिकाला वेळोवेळी आर्थिक मदत करण्याबरोबरच प्रशिक्षणासाठी खारघर येथील विद्यालयात विशेष सोय केली आहे. स्वस्तिकाने आपल्या खेळात सातत्य ठेवत एक एक टप्पा सर करत अभिमानास्पद आणि प्रेरणादायी काम केले आहे. तसेच पनवेलच्या स्वस्तिका घोषने शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार मिळवून संपूर्ण पनवेलकरांचे नाव उज्ज्वल केले आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी तिच्या परिश्रमाचे कौतुक करून तिला पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, सीकेटी (स्वायत्त) महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, जी. के. सुर्वे, क्रीडा प्रशिक्षक विनोद नाईक, स्वस्तिकाचे वडील संदीप घोष आदी उपस्थित होते.

## मोटार सायकलची चोरी

दैनिक युवक आधार
पनवेल, (वार्ताहर)

शहरातील महाड अर्बन बँकेजवळ उभी करून ठेवलेली 90 हजार रुपये किंमतीची मोटार सायकल अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना घडली आहे. हर्षद ठाकूर यांनी त्यांची 90 हजार रुपये किंमतीची होंडा एसपी 125 डिक्स मोटार सायकल क्र.एमएच-46-सीडब्ल्यू-1075 ही उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने सदर गाडी चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## गावठी दारु हस्तगत

दैनिक युवक आधार
पनवेल, (वार्ताहर)

तालुक्यातील मोरबे येथील पत्र्याच्या शेडसमोर विना परवाना गैरकायदा गावठी दारु जवळ बाळगल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी एका इसमावर कारवाई केली आहे.
सदर इसमाकडे जवळपास 400 रुपये किंमतीची गावठी दारु आढळून आल्याने त्याच्या विरोधात महाराष्ट्र दारु बंदी कायदा कलम 65 (ई) प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

## लग्नाच्या पार्टीत जेवण असताना मारहाण

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

लग्नाच्या पार्टीत जेवत असताना एका इसमास मारहाण झाल्याची घटना तालुक्यातील कोप्रोली येथे घडली आहे. अरविंदकुमार यादव (62) हे एका सेवानिवृत्त व्यक्तीच्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त कम्युनिटी हॉल रॉयल मेडॉस सोसायटी कोप्रोली येथे जेवत असताना आरोपी व्ही. के.मिश्रा यांनी त्यांच्याशी वाद घालून त्यांना शिवीगाळ करून लाथा बुक्क्याने जबरी मारहाण करून त्यांना जखमी केले. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## परिणीता सन्मान पुरस्कार सोहळा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

परिणीता सोशल फाऊंडेशन या महाराष्ट्रातील प्रसिद्ध एनजीओचा 'परिणीता सन्मान' पुरस्कार वितरण सोहळा आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल या नाट्यगृहात आयोजित करण्यात आला होता. यावेळी 17 जणांना गौरविण्यात आले. मॅनेजिंग डायरेक्टर ऑफ भावना ग्रुप, खा खेळा वाचा संस्थापक अपर्णा राजेश शहा यांना विशेष आमंत्रण करण्यात आले आणि सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी राज्याचे उद्योग मंत्री, महाराष्ट्र उदयजी सामंत, पनवेलचे शिल्पकार माजी खासदार रामशेठ ठाकूर, बँक ऑफ महाराष्ट्रच्या पनवेल शाखेचे एजीएम संजीत कुमार, अमरधाम इंडस्ट्रीजचे विजय लोखंडे, माधवबाग, खोपोलीच्या संचालिका डॉ. दिपाली देशमुख, जवाहर इंडस्ट्रीजचे कार्याध्यक्ष स्वप्निल गुप्ते, अल्ट्रा लुब्रिकंटचे सिद्धेश सावंत, एड. प्रथमेश सोमण, श्रीनाथ बिल्डर्सचे संचालक प्रशांत गायकवाड, भावना



ग्रुप मोटर्सच्या मॅनेजिंग डायरेक्टर, खा खेळा वाचा संस्थापक अपर्णा शाह, सामाजिक कार्यकर्त्या आणि टीआयपीलच्या संचालिका अर्चना परेश ठाकूर, लिली व्हॅलीच्या मीनल पटवर्धन, पुण्याच्या उद्योजिका प्रीती मुतालीक परिणीता संस्थेच्या संस्थापिका साक्षी सागवेकर आणि संस्थापक प्रशांत सागवेकर, परिणीता सन्मानचे सोहळा प्रमुख प्रसाद हनुमंते इ. मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचं सूत्रसंचालन डॉ मृण्मयी भजक यांनी केलं. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले, 'स्त्रीयांच्या कर्तृत्वाचा हा सोहळा खरच कौतुकास्पद आहे. वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या या महिलांचं कार्य मोठं आहे. या सोहळ्याला उपस्थित राहताना मला आनंद होत आहे. तसेच राज्याच्या उद्योग मंत्र्यांचा सत्कार करण्याची संधी मला मिळाली त्याचाही आनंद वाटला. परिणीता सोशल फाऊंडेशनच्या या कार्याला मी शुभेच्छा देतो. मॅनेजिंग डायरेक्टर ऑफ भावना ग्रुप, खा खेळा वाचा संस्थापक अपर्णा राजेश शहा यांना देखील स्मृती चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या स्वागतस्थळी नवी मुंबईतील रांगोळीकार मिताली सुर्वे यांनी काढलेली परिणीता सन्मानची रांगोळी चर्चेचा विषय बनली होती. अप्रतिम रांगोळी साकारुन मिताली सुर्वे यांनी उपस्थितांची मनं जिंकली.

### मागासलेल्या मच्छिमार बांधवासाठी 1 मे रोजी पनवेल महावितरण कार्यालयावर जनता दलाचा घंटानाद

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** गरीब आणि मच्छिमारी करणाऱ्या कोळी बांधवांना पनवेल महावितरणकडून न्याय मिळावा यासाठी जनता दल (सेक्युलर) 1 मे रोजी सकाळी 11.30 वाजता घंटानाद करणार आहे, अशी माहिती जनता दलाचे प्रदेश सचिव सुनील पोतदार यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.
पनवेल शहरातील साई नगर खाडी किनारी मच्छिमार करणाऱ्या कोळी बांधवांची घरे असून सदर घराला सन 2015 पासून वीज पुरवठा दिला गेला होता. परंतु कोरोना काळात मच्छिमारी व्यवसाय बंद झाल्याने कोळी बांधव आपल्या कोळीवाडा येथील घरी पुन्हा गेले. त्या काळात देखील महावितरण कंपनीची कोणतीही बिलाची बाकी ठेवली नाही व पुन्हा मच्छिमारी करण्यासाठी आपल्या झोपडीत आले. त्यावेळी तेथील विद्युत प्रवाह खंडीत झालेला होता म्हणून कोळी बांधव महावितरणाच्या अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांना भेटून विद्युत प्रवाह पुन्हा सुरूवात करावा अशी विनंती केली. त्यावेळी अतिरिक्त अभियंता यांनी असिस्टंट इंजिनिअर यांना भेटण्यास सांगितले. त्यप्रमाणे कोळी समाजाने त्यांची भेट घेतली असता नव्याने अर्ज करण्याची सुचना देवून त्यांना विद्युत वितरण कंपनीचे डिपॉझिट भरण्याचे दरपत्रक दिले. त्या दरपत्रकात दाखविलेली रक्कम कोळी बांधवाने महावितरणाच्या तिजोरीत भरणा करून देखील त्यांना विद्युत प्रवाह दिला गेला नाही. तो पुर्ववत करण्यासाठी आणि कोळी बांधवांना न्याय देण्यासाठी पनवेल शहर विद्युत वितरण कंपनीच्या कार्यालयावर 1 मे रोजी जनता दल (सेक्युलर) घंटानाद करणार आहेत असे जनता दल सेक्युलर पक्षाचे प्रदेश सचिव सुनील पोतदार यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

### पहलगाम येथील अतिरेक्यांनी धर्म विचारून हिंदूंवर केलेल्या भ्याड हल्ल्याच्या विरोधात शिवसेना माहीम विधानसभेचे तीव्र निषेध! आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राकेश रमेश पाटील**
**मुंबई (दादर )**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे मुख्य नेते मा. नामदार श्री एकनाथजी शिंदे साहेबांच्या आदेशाने व शिवसेना उपनेते मा आमदार श्री सदा सरवणकर यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना माहीम विधानसभातर्फे बुधवार दिनांक २३ एप्रिल २०२५ दादर स्थानकाजवळ या भ्याड हल्ल्याच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात आले, तसेच या दुर्घटनेत दुर्दैवाने मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. याप्रसंगी मा नगरसेवक समाधान सरवणकर, महिला विभाग प्रमुख श्रीमती प्रिया गुरव-सरवणकर, भारतीय जनता पक्षाचे माहीम विधानसभेचे नेते विवेक भाटकर, शिवडी-वरळी विधानसभा समन्वयक श्री नाना आंबोले तसेच शिवसेना माहीम विधानसभेचे वरिष्ठ पदाधिकारी भाई परब, गणेश कदम, कुणाल वाडेकर, निशिकांत पाताडे, सर्व शाखाप्रमुख,






## ओरायन मॉलचा नववा वर्धापनदिन थाटामाटात संपन्न

### ओरायन मॉलमध्ये नवीन येणाऱ्या मराठी चित्रपटांना प्रथम प्राधान्य देण्यात येते हे कौतुकास्पद : अभिनेते समीर चौघुले

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

पनवेल शहरातील एकमेव मॉल म्हणुन प्रसिद्ध असलेल्या ओरायन मॉलचा नववा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात थाटामाटात सिनतारकांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी आगामी काळात प्रदर्शित होणाऱ्या गुलकंद या चित्रपटाचे दिग्दर्शक सचिन गोस्वामी, लेखक सचिन मोटे, चित्रपटातील कलाकार समीर चौघुले, ईशा डे आदींच्या मान्यवरांच्या उपस्थितीत बहारदार व खुसखुशीत अशा मुलाखतीने कार्यक्रमाची सुरूवात झाली. या वर्धापन दिनी नऊ विजेत्यांना ओरायन मॉलच्या माध्यमातुन विशेष आकर्षक बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. याकरिता मॉल प्रशासनाने आयोजित केलेल्या शॉप अँड विन कॉन्टेस्टच्या विजेत्यांची निवड उपस्थित मराठी चित्रपटातील सेलेब्रिटींनी केली. या मराठी सेलेब्रिटी मध्ये स्मिता शेवाळे, नेहा नाईक, समीर चौघुले, इशा डे, तेजस बर्वे यांच्यासह गुलकंद या चित्रपटाचे दिग्दर्शक सचिन गोस्वामी, लेखक सचिन मोटे यांची उपस्थिती महत्वाची ठरली. यावेळी त्यांनी पनवेलकरांशी संवाद साधला. याप्रसंगी बोलताना अभिनेते समीर चौघुले यांनी सांगितले की, ओरायन मॉल हे नेहमीच नव्याने प्रदर्शित होणाऱ्या मराठी चित्रपटांना पाचही ठिकाणी प्राधान्य देतात. हे कौतुकास्पद आहे. मराठी माणूस असा एकमेकाच्या पाठी उभा राहिल्यास मराठीचा झेंडा अटकेपार लागल्याशिवाय राहणार नाही, असेही त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी गुलकंद चित्रपटासंदर्भात संवाद साधला. तसेच चित्रपटातील एका गाण्यावर नृत्य सुद्धा केले. या कार्यक्रमाला ओरायन मॉलचे मालक मंगेश परुळेकर, दिपक करेलिया, मनन परुळेकर आदी उपस्थित होते. दरम्यान नऊ विजेत्यांपैकी प्रथम विजेत्याला यमाहा फसिनो स्कुटर आणि द्वितीय विजेत्यांना आय पॅड व इतर विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात आले. याप्रसंगी मराठी चित्रपट मुक्ताई हा नुकताच प्रदर्शित झाला असून त्याला प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे या चित्रपटात भूमिका करणाऱ्या स्मिता शेवाळे यांनी सांगितले. तसेच आध्यात्मिक ओढा आता लोकांचा वाढत चालला असून पंढरपूरच्या वारीला जशी दरवर्षी गर्दी वाढत जाते तशाच प्रकारे आता मराठी चित्रपटांना सुद्धा चांगला प्रतिसाद मराठी बांधवांकडून मिळकत असल्याचे त्यांनी सांगितले. आवर्जून या सुट्टीच्या काळामध्ये हा चित्रपट आपल्या मुलांना दाखवावा असे आवाहन यावेळी त्यांनी केले.




## चिपळूण नगर परिषदेच्या 'वाचू आनंदाने' उपक्रमाला दिवसेंदिवस वाढता प्रतिसाद!



**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार**

**चिपळूण (प्रतिनिधी)--** : चिपळूण नगर परिषदेच्या वाचू आनंदाने या उपक्रमाला दिवसेंदिवस वाढता प्रतिसाद मिळत आहे. रविवार दिनांक 27 एप्रिल रोजी चिपळूण शहरातील नव्याने सुशोभित झालेल्या नारायण तलावाच्या परिसरात वाचू आनंदाने हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचा हा चौथा रविवार होता. विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी, यासाठी चिपळूण नगर परिषदेने वाचू आनंदाने हा उपक्रम आयोजित केला आहे. या उपक्रमांतर्गत दर रविवारी शहरातील निसर्गाच्या ठिकाणी विद्यार्थी, नागरिक एकत्र येतात. लोकमान्य टिळक स्मारक वाचनालय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाच्यावतीने पुस्तके उपलब्ध करून दिली जातात. आपल्याला हवं ते पुस्तक घ्यायचे आणि दोन तास निसर्गाच्या सानिध्यात मनसोक्त वाचायचं, अशी ही संकल्पना मुख्याधिकारी विशाल भोसले यांची आहे. कालचा रविवार हा चौथा रविवार होता. शहरातील नारायण तलाव परिसरात मोठ्या संख्येने वाचक उपस्थित होते. मुख्याधिकारी विशाल भोसले, डीबीजे महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाच्या प्रमुख डॉ. शिल्पा सप्रे, कैसर देसाई, सीए अमित ओक, समीर कोवळे, प्रशासकीय अधिकारी मंगेश पेढांबकर, उद्यान विभाग प्रमुख बापू साडविलकर, लोकमान्य टिळक वाचनालयाचे संचालक श्री. ओक, यशस्वी उद्योजक रामशेठ रेडीज, ग्लोबल चिपळूण टुरिझमचे विश्वास पाटील, ज्येष्ठ साहित्यिक प्रकाश देशपांडे, सुनिल खेडेकर आदींनीही या उपक्रमाला हजेरी लावली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्राची जोशी यांनी केले. येत्या रविवारी खेंड येथील हवेली येथे हा उपक्रम राबविण्यात येणार आहे, अशी घोषणा या वेळी प्रशासकीय अधिकारी मंगेश पेढांबकर यांनी केली. आभार आंबडेकर वाचनालयाचे संचालक प्रदिप पवार यांनी मानले.

## जागतीक पुस्तक दिनानिमित्त उरण नगरपरिषदेच्या मॉसाहेब मीनाताई ठाकरे ग्रंथालयाचा उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

सुयश क्लासेस चे हे विद्यार्थी तब्बल २ तास एका ठिकाणी शांतपणे बसून विविध पुस्तकांचे वाचन करीत होते जे पुस्तक स्वतःला आवडेल ते घेऊन वाचनामध्ये ही बाळगोपाळ मंडळी रमून गेली होती,ही किमया साध्यकेली होती उरण नगर परिषदेच्या मॉसाहेब मीनाताई ठाकरे ग्रंथालयाचे ग्रंथपाल संतोष पवार यांनी. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना श्री. पवार यांनी पुस्तकाचे वाचन कसे व का करावे याची सविस्तरपणे माहिती सांगून विविध प्रकारच्या पुस्तकांची माहिती दिली.पुस्तके वाचण्याचा जीवनात नेमका काय उपयोग असतो या मधुन आपल्याला कोणता फायदा होतो याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत समजून सांगितले,त्यानंतर ग्रंथपाल संतोष पवार यांनी अभ्यासाचे महत्व सांगून शिक्षण हा आपल्या उज्वल भवितव्याचा पया असल्याचे सांगत ते पुढे म्हणाले पाया जितका मजबूत तितकीच उज्वल यशाची इमारत उंच आणि मजबूत घडणार असल्याचे त्यांनी मुलांना उदारणासह शेवटी पटवून दिल्या मुळे विद्यार्थ्यांना ते पटले व सर्व मुळे वाचनात दंग झाली. शेवटी मुले निर्धाराने म्हणाली आम्ही या पुढे वाचनालयात नियमितपणे येणार असे मत या प्रसंगी विद्यार्थ्यांनी स्वेच्छेने व्यक्त केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथालयातील विद्यार्थी चेतन सोदारी, शिक्षक दिपक वायदाडे , शिक्षिका मनिषा म्हात्रे, शिक्षिका हेमांगी घरत , पालक स्वाती मोरे उपस्थीत होते विद्यार्थ्यांना लहान वयात वाचनाची गोडी लागणे आवश्यक आहे म्हणून वाचनालयातील सर्व विद्यार्थी आणि वाचकांनी उत्तम सहकार्य केले.




### श्रोणवी लोंढे हि झाली पीएसएस परिक्षेमध्ये मेरिटमध्ये उत्तीर्ण

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**



करंजाडे गावाचे पोलीस पाटील भिम अनुयायी कुणाल लोंढे यांची कन्या कु. श्रोणवी कुणाल लोंढे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (पीएसएस )इ 8 वी गुणपत्रिका 2025 मध्ये मेरिट मध्ये उत्तीर्ण झाली आहे.
या तिच्या यशाबद्दल तिच्या शाळेसह समाज बांधव, विविध संघटना, ग्रामस्थांनी तिचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## राज्यस्तरीय सीनियर टेनिस क्रिकेट स्पर्धेचे नाशिक संघाला प्रथम पारितोषिक.

**दैनिक युवक आधार**
उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक विनोद गायकवाड.

द्वितीय क्रमांक जालना,तृतीय क्रमांक नाशिक ग्रामीण नाशिक .८ वी राज्य अंजिक्यपद व निवड चाचणी स्पर्धा २०२४-२५ पुरुष गटात नाशिक शहर संघ विजयी तर महिला गटात सांगली संघ विजयी. सदर स्पर्धा टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र व नाशिक जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशन याच्या सयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. स्पर्धा एम्. एम्. सी क्रीडांगण म्हसरूळ, नाशिक येथे पार पडली. सदर स्पर्धेत पुरुष विभागात एकूण ११ संघ सहभागी झाले होते, तर महिला गटात ३ संघ सहभागी झाले होते. स्पर्धेचे उदघाटन टेनिस क्रिकेट असोसिएशन ऑफ इंडिया व टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र सचिव सौ. मिनाक्षी गीरी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या स्पर्धे उद्घाटन प्रसंगी टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्रचे उपाध्यक्ष श्री. विलास गीरी सर, टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र महिला अध्यक्षा




धनश्री गिरी तसेच मुंबई उपनगर जिल्हा सचिव
श्सदीप पाटील, सांगली जिल्हा सचिव,
विजय बिराजदार, रायगड जिल्हा सचिव स्वप्नील सर नाशिक जिल्हा सचिव विलास गायकवाड व सर्व पंच मंडळ उपस्थित होते.
सदर स्पर्धा प्रथम साखळी साखळी पद्धतीने घेण्यात आल्या त्यानंतर
बाद पद्धतीने पार पडली. उंपात्य फेरीत नाशिक शहर संघाने नाशिक ग्रामीण संघावर मात करत अंतिम फेरीत प्रवेश केला. दुसऱ्या उंपात्य फेरीत जालना जिल्हा संघानी हिंगोली जिल्हा संघावर मात करत अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामन्यात नाशिक शहर संघानी जालना जिल्हा संघावर मात करत अंतिम विजेतेपद प्राप्त केले. तर महिला गटात सांगली जिल्हा संघाने रायगड जिल्हा संघावर मात करत अंतिम विजेतेपद प्राप्त केले.
स्पर्धेत जालना जिल्हा संघाचे अमोल व माही यांनी अनुक्रमे फलंदाज व गोलंदाज गणेश नाशिक शहर संघाच्या स्पर्धेचा मानकरी ठरला.
महिला गटात साक्षी गणे फलंदाज, अमूल्या गोलंदाज व साक्षी गणे स्पर्धेची मानकरी ठरली.
सदर स्पर्धेत विजय उमरे. लखन देशमुख, सोमा बिरादार, दर्शन थोरात, प्रथमेश नानजकर, महेंद्र देशमुख, मानस पाटील, धनश्री गिरी, साक्षी गणे, रूतुजा तोरडमल, रोहिणी सकटे, धनंजय लोखंडे, सुनील मोर्यो यांनी पंच म्हणून काम पार पाडले. स्पर्धेचा बक्षीस समारंभ टेनिस क्रिकेट असोसिएशन ऑफ इंडिया व टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र सचिव . मिनाक्षी गीरी याच्या हस्ते पार पडला. विलास गीरी ,धनश्री गिरी , संदीप पाटील, विजय बिराजदार, सिद्धेश गुरव, कुणाल हळदणकर, संदीप शिंदे, स्वप्नील सर, विलास गायकवाड, सर्व पंच मंडळ यांच्या उपस्थितीत पार पडला.
नाशिक जिल्हा सचिव . विलास गायकवाड यांनी सर्व मान्यवरांचे तसेच संघ, खेळाडू, व उपस्थिताचे आभार मानले. व अध्यक्षांच्या संमतीने स्पर्धा संपल्याचे जाहीर केले.

### उरण तालुक्यातील क्रिकेट खेळाडूंसाठी सुसज्ज क्रीडांगणाची आमदार महेश बालदी यांना विनंती करणार.. मुकुंद गावंड

#### आवाज महामुंबईचा चॅनेल कडून मुकुंद गावंड सन्मानित.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

नवोदित क्रिकेट खेळाडूंना एक व्यासपीठ निर्माण व्हावे म्हणून समर्थ चषक रजनी टेनिस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करणारे उरण तालुका भाजपा उपाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते मुकुंद गावंड यांना आवाज महामुंबईचा चॅनेल कडून सन्मानपत्र,शाल, श्रीफळ देऊन पिरकोन येथील त्यांच्या निवासस्थानी रविवार दिनांक २७ एप्रिल रोजी सन्मानित करण्यात आले. यावेळी आवाज महामुंबईचा चॅनेलचे संपादक मिलिंद खारपाटील, आवाज महामुंबईचा चॅनेलचे जेष्ठ पत्रकार अनंत नारंगीकर त्यांच्या मातोश्री पिरकोन ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच भागाबाई गावंड , श्री गणेश महिला मंडळ पीरकोनच्या सचिव बिंदू गावंड आदी उपस्थित होते. नुकतेच पिरकोन येथे समर्थ चषक रजनी टेनिस क्रिकेट स्पर्धा यशस्वी रित्या संपन्न झाली.अनेक मान्यवरांसह हजारो क्रिकेट प्रेमी या सामन्यांना उपस्थित राहिले. आणि याची चर्चा रायगड जिल्ह्यातील गल्लोगल्ली आणि नाक्या नाक्यावर ऐकायला मिळाली.
मुकुंद गावंड यांनी समर्थ चषक यशस्वी होण्यासाठी पिरकोन ग्रामस्थ, मित्रमंडळी यांनी सहकार्य केल्याचा आवर्जून उल्लेख केला. मुकुंद गावंड यांनी उरण तालुक्यात अनेक सामाजिक उपक्रम राबविले असून खरोखरच उरण पूर्व विभागात विकासाची गंगा आणली आहे.उरण तालुक्यातील
क्रिकेट खेळाडूंनी रणजी, आय पी एल याच बरोबर हिंदुस्थानच्या टीम मध्ये खेळावे ही त्यांची अतोनात इच्छा आहे. यासाठी ते उरणचे दमदार आमदार महेशशेठ बालदी यांना विनंती करून उरणच्या खेळाडूसाठी भव्य क्रीडांगणासाठी मागणी करणार आहेत. आणि उरण चे विकासपुरुष, उरण च्या विकासाला वाहून घेतलेले आमदार महेश बालदी हे उरण तालुक्यासाठी भव्य क्रीडांगण ची मागणी नक्कीच पूर्ण करतील असा खात्रीचा आशावाद त्यांनी आमच्या प्रतिनिधी जवळ व्यक्त केला.



www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

दै.युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

# दैनिक युवक आधार चे कार्यकारी संपादक श्री सुरेश भोईर यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात संपन्न






























